# मराठी भाषेचा प्रवास लोकसंस्कृतीत

तळेगाव दाभाडे : अभिजात मराठी भाषेचा खरा इतिहास हा लोकसंस्कृतीत आणि लोकभाषेत शोधला पाहिजे. निर्माता, दिग्दर्शक, नेपथ्यकार नसलेल्या लोकसाहित्याने मराठी भाषा समृद्ध केली आहे, असे स्पष्ट मत मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी मांडले.

यशोदा महादेव काकडे अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या 'लोकरंगभूमी आणि अभिजात मराठी भाषा' या विषयावरील एक दिवसीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या परिसंवादाचे आयोजन साहित्य अकादमी आणि इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पानिपतकार विश्वास पाटील होते. व्यासपीठावर नाट्यदिग्दर्शक वामन केंद्रे, साहित्य अकादमीचे ओम प्रकाश नायर, लोकसाहित्य तज्ज्ञ डॉ. प्रकाश खांडगे, डॉ. अनिल सहस्रबुद्धे, गणेश चंदनशिवे उपस्थित होते.

विश्वास पाटील यांनी लोककलांनी स्थलकालाचे भान ठेवून आपला साज बदलला पाहिजे, तरच त्या जिवंत राहतील, असे मत व्यक्त केले. डॉ. खांडगे यांनी अभिजात मराठीला ऊर्जा देणारे लोकभाषेचे योगदान मोठे असून, लोकरंगभूमीवर बोलीभाषेचा सहज प्रभाव दिसतो, असे सांगितले. वामन केंद्रे यांनी लोकनरंगभूमीवर वापरली जाणारी भाषा ही नाटक आणि सिनेमा यांच्यापेक्षा अधिक प्रभावी असते, असे प्रतिपादन केले.

परिसंवादात विधिनाट्य, भक्तिनाट्य, वगनाट्य, लोकनाट्य आणि तमाशाच्या रंगभाषेचा अभिजात मराठीवरील प्रभाव विविध अभ्यासकांनी अभ्यास निबंधांद्वारे मांडला. दोन सत्रांत झालेल्या चर्चासत्रात प्रा. सत्यजीत खांडगे यांनी सूत्रसंचालन केले, तर उपप्राचार्य संदीप भोसले यांनी आभार मानले. परिसंवादात राज्यभरातील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.